**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** उंब्रज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0185 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/03/2023 00:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 01/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/03/2023
**Time From (वेळेपासून):** 12:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/03/2023 **Time (वेळ):** 00:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/03/2023 00:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आदर्श प्राथमिक विद्यामंदिर, उंब्रज ता कराड,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned by CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौ. स्वाती सोमनाथ दिक्षित

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु शिवडे, पो उंब्रज ता करा,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु शिवडे, पो उंब्रज ता करा,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788122232

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ. उज्वला सर्जेराव शेलार पोळ | | | 1. शहापूर, ता कराड ,उंब्रज, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बापू सर्जेराव सुर्यवंशी | | | 1. भुयाचीवाडी पो पेरले ता कराड, उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारली रक्कम | 1,875.00 |



Scanned by CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,875.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 01/03/2023

मी, सौ. स्वाती सोमनाथ दिक्षित, वय 44 वर्षे, रा. मु. शिवडे, पो. उंब्रज ता. कराड, जि. सातारा नोकरी- उपशिक्षीका, आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उंब्रज ता. कराड, जि. सातारा (द्वारा- कृष्णा शिक्षण प्रसारक मंडळ उंब्रज) मो.नं. 8788122232.

मी दि. 28/02/2023 रोजी संध्याकाळी सुमारे 7 वाजणेच्या सुमारास ऍन्टी करप्शन ब्युरो सातारा येथे समक्ष हजर राहून पोलीस उप अधीक्षक श्रीमती वैद्य मॅडम यांची भेट घेवून माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व ती मी माझ्या हाताने लिहून वैद्य मॅडम यांचेकडे दिली. त्यानुसार मी माझेकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली. तसेच मला शाळेत नोकरीसाठी जावे लागत असल्याने शाळा बुडवून पुन्हा ऍन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात येण्यास जमणार नाही तर तुम्हीच उंब्रज येथे येवून माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती मी वैद्य मॅडम यांना केली.

त्यानुसार दि. 01/03/2023 रोजी सकाळी 10.10 चे सुमारास मी व माझे पती असे वैद्य मॅडम यांचे सांगणे नुसार मसूर फाटा येथे थांबलो असताना वैद्य मॅडम व त्यांचे पथक त्या ठिकाणी आले. तेव्हा वैद्य मॅडम यांचे सांगणे नुसार मी व माझे पती गाडी मध्ये बसलो व वैद्य मॅडम यांनी गाडीतील पंचांची माझेशी व माझी पंचांशी ओळख करुन देवून पंचांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली की, मी उपशिक्षीका, आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उंब्रज ता. कराड, जि. सातारा म्हणून कार्यरत असून या शाळेतील मुख्याध्यापिका सौ. शेलार (पोळ) मॅडम व उप शिक्षक सूर्यवंशी सर हे माझेकडे, शाळेच्या वार्षिक तपासणी दरम्यान तपासणी टीमने शाळेला चांगला शेरा दयावा व तपासणी टीमवर झालेल्या खर्चापोटी माझ्या वाट्याची 1875/- रु. इतकी रक्कम लाच म्हणून मागितली असून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार असून तशी मी सविस्तर लेखी तक्रार नोंदविली असल्याचे सांगितले व माझी लेखी तक्रार पंचांना वाचायला देवून त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या.

त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांचे सुचनेवरुन पोशि भोसले यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सीलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवून त्याबाबत संपूर्ण माहिती देवून त्यांचेकडील सीलबंद मेमरी कार्ड काढून व्हॉईस रेकॉर्डर मंध्ये घातले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं. 1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डरसह मला व पंच नं. 1 यांना मुख्याध्यापिका सौ. शेलार (पोळ) मॅडम व उप शिक्षक सूर्यवंशी सर यांची भेट घेण्यासाठी पाठवले ती वेळ 11.42 वाजताची होती. सदर वेळी सापळा पथकातील इतर लोक हे माझ्या शाळेच्या जवळच शासकीय वाहनात थांबून होते. मी शाळेत गेले तेव्हा माझी भेट मुख्याध्यापिका सौ. शेलार (पोळ) मॅडम यांचेशी झाली. तेव्हा शेलार मॅडम यांनी वार्षिक तपासणी दरम्यान तपासणी टिमने शाळेला चांगला शेरा दयावा यासाठी व वार्षिक तपासणी दरम्यान झालेल्या इतर खर्चापोटी माझ्या वाटयाची रक्कम म्हणून 1875/- रु. लाचेची मागणी करुन ती रक्कम सुर्यवंशी सर यांचेकडे देण्यास सांगितली. त्यानंतर मी व पंच असे शासकीय वाहना जवळ परत आलो ती वेळ 12.01 वा.ची होती. त्यावेळी वैद्य मॅडम यांचे सूचनेवरुन मपोशि गुरव यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.1 यांना झालेली हकिकत विचारुन तसेच रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून, मुख्याध्यापिका शेलार (पोळ) यांनी माझ्याकडे 1875/- रु. लाचेची मागणी करुन ती रक्कम सूर्यवंशी सर यांचेकडे देण्यास सांगितल्याची पोउपअधी वैद्य मॅडम यांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.

त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी सापळा कारवाईचे आयोजन करुन 1875/- रु. लाच रक्कम हजर करण्यास सांगितल्याने मी 1875/- रु इतकी लाचेची रक्कम पोउपअधी वैद्य मॅडम यांचेकडे हजर केली. पोउपअधी वैद्य मॅडम यांनी त्यानंतर सापळा पूर्व व सापळा कारवाईची थोडक्यात माहिती मला व पंचांना सांगून ऍन्थ्रासीन पावडर व अल्ट्रा व्हॉयलेट दिवा याची माहिती देवून त्याचे प्रात्याक्षिक शासकीय वाहनामध्येच करुन दाखविले. पथकातील



Scanned by CamScanner

चापोना अडागळे यांनी 1875/- रु. लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रासीन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या पर्समध्ये ठेवून दिली. सदरची सापळापूर्व कारवाई शासकीय वाहनामध्येच पूर्ण करण्यात आली. पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकाला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या आणि मला व पंच नं. 1 यांना लाचेची रक्कम घेवून उप शिक्षक सुर्यवंशी सर यांना लाचेची रक्कम देण्यासाठी रवाना केले ती वेळ 12.50 वा.ची होती.
त्यानंतर मी व पंच नं. 1 असे चालत आमच्या शाळेमध्ये गेलो. मी शाळेच्या मागच्या बाजूला असलेल्या सुर्यवंशी सरांच्या वर्गामध्ये जावून त्यांना मुख्याध्यापिका मॅडमने शाळेच्या वार्षिक तपासणी साठी झालेल्या खर्चाचे व तपासणी टिमला दयायच्या पैशांपोटी मला 1875/- रु. तुमच्याकडे दयायला सांगितले आहेत असे सांगितले असता सुर्यवंशी सर यांनी त्यास होकार दर्शवून मी त्यांचे समोर धरलेली लाचेची रक्कम त्यांचे डावे हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. तेव्हा मी वर्गाच्या बाहेर येवून सापळा पथकाला दिसेल अशा रितीने माझ्या डाव्या हाताने साडीच्या पदराने तोंड पुसून पूर्वनियोजित इशारा केला.
सदर इशारा पाहून पोउपअधी वैद्य मॅडम व पथकाने माझ्या जवळ येवून माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ 12.58 वा.ची होती त्यानंतर सापळा पथकाने सुर्यवंशी सर यांना ताब्यात घेतले व त्यानंतर मुख्याध्यापिका सौ. शेलार (पोळ) मॅडम यांना देखील ताब्यात घेतले. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. निकम सर यांना बोलावून सापळा कारवाईची माहिती दिली व संस्थेचे अध्यक्ष श्री घाडगे यांना फोनद्वारे कारवाईची माहिती दिली तसेच शेलार मॅडम व माझ्या वर्गातील मुलांचा ताबा माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री निकम सर यांना दिला. त्यानंतर सापळा पथक पंचनाम्याचे पुढील कारवाई करण्याकरीता ॲन्टी करप्शन ब्युरो सातारा येथील कार्यालयामध्ये आले व याच ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.
तरी दि. 01/03/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेविका सौ. उज्वला सर्जेराव शेलार (पोळ), मुख्याध्यापिका (प्राथमिक)वर्ग-2, आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उंब्रज ता. कराड, जि. सातारा रा. शहापूर, ता. कराड , जि. सातारा यांनी शाळेच्या वार्षिक तपासणी दरम्यान तपासणी टिम कडून शाळेला चांगला शेरा मिळण्यासाठी व तपासणी टिमवर खर्च करण्यात आलेल्या पैशांपोटी माझ्याकडे 1875/- रु. इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती लोकसेवक बापू सर्जेराव सुर्यवंशी , उप शिक्षक (प्राथमिक) )वर्ग-3, आदर्श प्राथमिक विद्यामंदिर उंब्रज ता. कराड, जि. सातारा रा. भुयाचीवाडी पो. पेरले ता. कराड , जि. सातारा यांचेकडे देण्यास सांगून लोकसेवक बापू सुर्यवंशी यांनी सदर लाचेची रक्कम माझ्याकडून स्विकारली म्हणून माझी सौ. शेलार मॅडम व सुर्यवंशी सर यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष हे लिहून दिले

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
Ajay Gorad (I (Inspector)) / Pobn84262 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

SBDixit

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
दि. 4/3/2023 रोजी 10/00 वा.

ASI
(आर. बी. साकोरे)
पोलीस स्टेशन ऑफिसर
[illegible] पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Ajay Gorad
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** Pobn84262



Scanned by CamScanner